# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.05.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या,**

- **पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कर्नाटक आणि तेलंगण राज्यांचा दौऱ्यावर, विविध विकासकामांचं करणार भूमीपूजन.**
- **तामिळनाडूमध्ये टीव्हीके पक्षाचे सी जोसेफ यांचा मुख्यमंत्रीपदी आज शपथविधी**
- **रशिया- युक्रेनमधील संघर्ष संपुष्टात येण्याच्या मार्गावर, रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांचा दावा.**
- **आणि**
- **तिरंदाजी विश्व चषक स्पर्धेत पुरुषांच्या वैयक्तिक 'कंपाउंड' प्रकारात, महाराष्ट्राच्या साहिल जाधवला कास्यपदक**

**आता सविस्तर बातम्या**

**पंतप्रधान-दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कर्नाटक आणि तेलंगण राज्यांचा दौरा करणार आहेत. बंगळुरू इथल्या 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या ४५ व्या वर्धापन दिन सोहळ्यात पंतप्रधान सकाळी सहभागी होतील आणि 'आर्ट ऑफ लिव्हिंग आंतरराष्ट्रीय केंद्रा'मध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या 'ध्यान मंदिरा'चे उद्घाटन करतील. या कार्यक्रमादरम्यान मोदी उपस्थितांना संबोधितही करतील.

त्यानंतर, हैदराबादकडे प्रयाण करून मोदी हैदराबादमध्ये साडे नऊशे कोटी रुपयांहून थोड्या कमी मूल्यांच्या विविध विकास प्रकल्पांचं भूमिपूजन आणि उद्घाटन करतील. त्याशिवाय हैदराबाद-पणजी आर्थिक परिक्षेत्र मार्गिकेवरील तीन हजार रुपये खर्चाच्या 'राष्ट्रीय महामार्ग-१६७'च्या गुडिबेल्लूर ते महबूबनगर या टप्प्याचं चार-पदरीकरणाचे भूमीपूजन त्यांच्या हस्ते होईल. त्यानंतर पंतप्रधान वारंगल इथल्या 'पीएम मित्र पार्क'चं उद्घाटन करतील; 'पीएम मित्र योजने'अंतर्गत विकसित करण्यात आलेलं हे पार्क 'काकतीय मेगा टेक्स्टाईल पार्क' म्हणून ओळखलं जातं. देशाच्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून मोदी हैदराबाद इथल्या कर्करोगाच्या उपचारांवर भर देणारे 'सिंधू रुग्णालय' राष्ट्राला समर्पित करतील.

**तामिळनाडू**

तामिळनाडूमध्ये टीव्हीकेपक्षाचे प्रमुख सी. जोसेफ विजय आज सकाळी १० वाजता चेन्नई इथं मुख्यमंत्रीपदासाठी शपथ घेतील. विजय यांच्यासोबत टीव्हीकेचे नऊ मंत्रीही शपथ घेण्याची शक्यता आहे. २३४ सदस्यीय विधानसभेत १२० आमदारांचा पाठिंबा मिळवल्यानंतर तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांनी विजय यांची मुख्यमंत्रीपदी नियुक्ती केली. प्रत्येकी दोन आमदार असलेल्या व्हीसीके आणि IUML कडून पाठिंब्याची पत्रं सादर करण्यात आल्यानंतर विजय यांची मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. विजय यांना १३ मे अथवा त्यापूर्वी विधानसभेत विश्वासदर्शक ठराव मांडण्याचे निर्देशही दिले आहेत.

**आसाम भाजप बैठक**

आसाम भाजपा विधीमंडळ पक्षाने आज नेता निवडीसाठी बैठक बोलावली आहे. भाजपचे केंद्रीय निरीक्षक जे. पी. नड्डा आणि सह निरीक्षक नायब सिंग सैनी यांच्या उपस्थितीत सकाळी नऊ वाजता ही बैठक होईल. त्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडी विधीमंडळ पक्ष सरकार स्थापनेचा दावा करण्यासाठी राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी भेट घेतील. येत्या १२ मे रोजी नियोजित शपथविधी सोहळ्याची राज्यात तयारीही युद्धपातळीवर सुरू आहे.

**पश्चिम-बंगाल**

सुवेंदू अधिकारी यांनी, पश्चिम बंगालचे नववे आणि भाजपचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल त्यांचं अभिनंदन केलं. तसंच त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्र्यांसोबत शपथ घेतलेल्या इतर पाच मंत्र्यांचंही पंतप्रधानांनी अभिनंदन केलं. हे सर्व नेते मंत्री म्हणून पश्चिम बंगालच्या विकासाच्या प्रवासाला आणखी बळकट करतील, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

**पबंगालकायदा सुव्यवस्था**

पश्चिम बंगालचे नवनियुक्त मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी उद्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसमवेत बैठक बोलावली आहेत. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलिस आयुक्त, वरिष्ठ रेल्वे पोलीस अधिकारीआणि विशेष पोलिस पथकांचे प्रमुख  आणि इतर अधिकाऱ्यांना बैठकीला उपस्थित राहाण्याचे निर्देश दिले आहेत.

**टीएमसी विरोधी पक्षनेते**

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने बालीगंजचे आमदार शोभनदेव चटोपाध्याय यांची विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्ती केली आहे. धनेखालीच्या आमदार असीमा पात्रा आणि चौरंगीच्या आमदार नयना बॅनर्जी या विरोधी पक्षाच्या उपनेत्या म्हणून काम पाहाणार आहेत. तर मुख्य प्रतोद म्हणून फिरहाद हकीम म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**केरळ काँग्रेस बैठक**

केरळमध्ये सरकार स्थापनेविषयी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक काल दिल्ली झाली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या दिल्लीतल्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत पक्षाचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केरळ राज्याच्या प्रभारी सरचिटणीस दीपा दासमुन्शी, संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल आणि केरळचे ज्येष्ठ नेते रमेश चेन्निथला आणि व्ही. डी. सतीशन उपस्थित होते. केरळच्या नव्या मुख्यमंत्र्यांबाबतचा अंतिम निर्णय पक्षाचे अध्यक्ष आणि राहुल गांधी घेतील अशी माहिती पक्षानं दिली आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे.

**पुतीन**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांनी, रशिया- युक्रेनमधील संघर्ष संपुष्टात येण्याच्या मार्गावर असल्याचं म्हटलं आहे. आखाती प्रदेशातील संघर्षही लवकरच निवळेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या संघर्षातल्या वाढीचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील असा इशाराही दिला. रशियानं चार वर्षांपूर्वी युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर मॉस्को आणि पाश्चात्य देशांमधील संबंध तणावाचे होते. युरोपिय नेत्याशी चर्चा करण्यासाठी तयार आहात का या प्रश्नावर उत्तर देताना पुतीन यांनी जर्मनीचे माजी चान्सलर गेहार्ड श्रोडर यांना पसंती दिली. कायमस्वरूपी शांतता करार झाल्यानंतरच आपण युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेनस्की यांना भेटू असंही पुतीन यांनी म्हटलं आहे.

**एच१बीअमेरिका**

अमेरिकेने एच१बी व्हिसा अंतर्गत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाच्या मर्यादेत ३० टक्क्यांनी वाढ करण्याचा प्रस्ताव दिला आहे. यामुळे परदेशी नागरिकांना अमेरिकेच्या नागरिकांपेक्षा कमी वेतन घेण्यास मज्जाव करता येईल. नव्या नियमांनुसार नवशिके ते अनुभवी कामगारांसाठीच्या चार श्रेणींसाठीचे किमान वेतन वाढवण्याचा प्रयत्न असल्याचं सांगितलं जातं आहे. प्रचलित वेतनस्तर वीस वर्षांपूर्वीचा आहे, त्यामुळे अमेरिकेतली कामगारांना पुरेसे संरक्षण मिळत नसल्याचा दावा केला जातो.

**क्षेपणास्त्र**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच डीआरडीओनं विकसित केलेल्या एमआयआरव्ही प्रणालीनं सुसज्ज असलेल्या प्रगत अग्नी या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी काल ओडिशातल्या डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम बेटावरून करण्यात आली. या चाचणीबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीचं अभिनंदन केलं आहे. वाढत्या सुरक्षितता आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, देशाच्या संरक्षण सज्जतेमध्ये या क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीमुळे मोलाची भर पडेल असं सिंह यांनी म्हटलं आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या पंतप्रधान कमला प्रसाद-बिसेसर यांच्यासोबत स्थानिक नेल्सन बेटाला भेट दिली. गिरमिटिया अर्थात भारतीय करारबद्ध मजूर त्रिनिदाद आणि टोबॅगोमध्ये पहिल्यांदा आले त्यावेळी ते नेल्सन बेटावर आले होते. नेल्सन बेटावरील एका 'क्विक इम्पॅक्ट प्रोजेक्ट'मध्ये डॉ. जयशंकर डॉ. कमला प्रसाद-बिसेसर यांच्यासह सामील झाले.

**कंत्राटी कामगार**

केंद्रीय मंत्रालयं, विभाग, स्वायत्त परिषदा आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र आदींमधील उपक्रमांमध्ये बाह्य स्रोत तसंच कंत्राटी कामगारांचं संरक्षण अधिक बळकट करण्यासाठी कामगार कायद्यांशी निगडीत नियुक्तीसंबंधित अनुपालन करण्यासंदर्भात काही नव्या उपाययोजना सुचवल्या आहेत. या सुधारणांचा उद्देश वेळेवर वेतन देणे, सामाजिक सुरक्षा योगदानाचा अनिवार्य भरणा, कंत्राटदार आणि मुख्य नियोक्त्यांची जबाबदारी निश्चित करणे तसंच कामगार कायद्याच्या उल्लंघनाविरूद्ध बळकट अंमलबजावणी यंत्रणा सुनिश्चित करणं हा आहे.

**सीबीएससीमेट**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या सहयोगानं दिल्लीत काल माइंड ॲक्टिव्हेशन थ्रू एज्युकेशन म्हणजेच मेट या समुपदेशकांच्या संमेलनाचं आयोजन केलं होतं. प्रकल्प मेट या अंतर्गत असलेल्या हा उपक्रम किशोरवयीन मुलांच्या सर्वांगीण कल्याणासाठी समर्पित असेल. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबत भावनिक, सामाजिक आणि मानसिक आरोग्याला चालना देणे असा आहे.

**त्रिपुरा-बांग्लादेश**

त्रिपुरा राज्याच्या सिपाहिजाला जिल्ह्यातील  भारत बांग्लादेश आंतरराष्ट्रीय सीमेवर शुक्रवारी रात्री झालेल्या चकमकीनंतर तणाव वाढला आहे. या घटनेत तीन बांग्लादेशी नागरिकांचा मृत्यू झाला असून, २३ जण जखमी झाले आहेत. शुक्रवारी रात्री 'पथारियादार' सीमेवर गेट क्रमांक १०१ जवळ ही घटना घडली.संशयित तस्करांच्या गटानं माशांची पिल्लांची तस्करी करण्याच्या उद्देशाने  भारतीय हद्दीत प्रवेश केला होता. पुन्हा बांगलादेशात परतण्याचा प्रयत्न करत असताना, सीमा सुरक्षा दलाच्या गस्ती पथकानं त्यांना अडवलं तेव्हा चकमक घडली.

**सोमनाथ-पूल-विजया**

पवित्र सोमनाथ मंदिराला पंच्चाहत्तर वर्ष पूर्ण झाली असून, यानिमित्त आयोजित सोमनाथ अमृत पर्वला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. भारताचं पहिलं नेट झिरो मंदिर होण्याचं उद्दीष्ट मंदिर ट्रस्टनं बाळगलं आहे. मिशन लाईफ या उपक्रमाअंतर्गत या मंदिरातील फुलांच्या आणि प्लास्टिक कचऱ्यापासून पेव्हर ब्लॉक्स तयार केले जातात. तसंच मंदिर परिसरात अत्याधुनिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, पर्जन्यजल साठवणूक प्रणाली, मियावाकी जंगले यांच्या माध्यमातून शून्य कार्बन फूटप्रिंटच्या दिशेने ही ट्रस्ट वाटचाल करत आहे.

**बॉक्सिंग**

ताश्कंद इथं सुरू असलेल्या सतरा वर्षांखालील आणि पंधरा वर्षांखालील आशियाई मुष्टीयुद्ध स्पर्धेत, भारताच्या १५ वर्षांखालील मुलींनी दमदार कामगिरी केली आहे. विविध वजनी गटांमध्ये एकंदर ९ भारतीय मुष्टीयोद्ध्यांनी अंतिम फेरीत धडक मारली आहे.

अक्षिताने ३०-३३ किलो वजनी गटात दणदणीत विजय नोंदवला तर अंजीनं उझबेकिस्तानच्या खेळाडूवर ५-० असा एकतर्फी विजय मिळवला. सोनिया, तन्वी, हंसिका अत्री यांनीही प्रतिस्पर्ध्यांना प्रभावी खेळ करत मात दिली.

**नेमबाजी**

चीनमधील शांघाय इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्व चषक स्पर्धेत पुरुषांच्या वैयक्तिक 'कंपाउंड' प्रकारात, महाराष्ट्राच्या साहिल जाधवनं काल कास्यपदक पटकावलं. त्यानं डेन्मार्कचा अनुभवी खेळाडू आणि प्रशिक्षक मार्टिन डॅम्सबो याचा १४७-१४४ अशा गुणांनी पराभव केला. गेल्या वर्षी शांघायमध्येच भारतानं 'कंपाउंड' प्रकारात पाच पदकं जिंकली होती.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

- **पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कर्नाटक आणि तेलंगण राज्यांचा दौऱ्यावर, विविध विकासकामांचं करणार भूमीपूजन.**
- **तामिळनाडूमध्ये टीव्हीके पक्षाचे सी जोसेफ यांचा मुख्यमंत्रीपदी आज शपथविधी**
- **रशिया- युक्रेनमधील संघर्ष संपुष्टात येण्याच्या मार्गावर, रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांचा दावा.**
- **आणि**
- **तिरंदाजी विश्व चषक स्पर्धेत पुरुषांच्या वैयक्तिक 'कंपाउंड' प्रकारात, महाराष्ट्राच्या साहिल जाधवला कास्यपदक**

## याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.